**ठळक बातम्या**

- अन्नधान्य निर्मितीत भारताला आत्मनिर्भर करुन, निर्यातीचं लक्ष्य ठेवण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन,

- राज्यातल्या ९ जिल्ह्यांसह देशातल्या एकूण १०० जिल्ह्यांमध्ये पीएम धनधान्य कृषी योजनेची सुरुवात

- जमीन मोजणीसाठी राज्य सरकार आता परवानाधारक खाजगी भूमापकांची नियुक्ती करणार, महिनाभरात होणार जमीन मोजणी पूर्ण

**आणि**

- भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याच्या पहिल्या डावात वेस्ट इंडिजची खराब सुरुवात

**<><><><><>**

अन्नधान्य उत्पादनात भारताला आत्मनिर्भर करणं तसंच जागतिक बाजारासाठी उत्पादन करणं हे आपलं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रारंभ आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या **पालघर, रायगड, धुळे, छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली** या नऊ जिल्ह्यांतही ही योजना सुरू झाली. याबाबत अधिक जाणून घेऊ या आमच्या प्रतिनिधीकडून...

**------कॅप्सूल-----**

*(पीएम धनधान्य कृषी योजना देशभरातल्या शंभर जिल्ह्यांमध्ये राबवली जाणार आहे. २४ हजार कोटी तरतूद यासाठी करण्यात आली आहे. कृषी उत्पादकता वाढवणं, सिंचनाच्या सुविधा सुधारणं, शाश्वत कृषी पद्धतीचा अवलंब करणं, शेतकऱ्यांना अल्प आणि दीर्घ मुदतीची कर्ज उपलब्ध करून देणं हे या योजनेचं उद्दिष्ट आहे. धनधान्य कृषी योजनेत पशुधनावर लक्ष केंद्रित केल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.*

***होल्ड बाईट***

*११ हजार ४४० कोटी रुपये खर्चाची डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता आणणारी मोहीम देशभरात राबवण्यात येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशातल्या ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळीचं उत्पादन करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. यात तूर, उडीद, मसुर डाळीचं उत्पादन वाढवलं जाईल, याचा फायदा दोन कोटी डाळ उत्पादकांना होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी यावेळी कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातल्या ५ हजार ४५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचंही उद्घाटन केलं.*

*यावेळी प्रधानमंत्र्यांनी गेल्या अकरा वर्षात कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा आढावा घेतला. या काळात अन्नधान्य उत्पादन ९०० लाख मेट्रिक टन वाढलं, फळभाज्या उत्पादन ६४० लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त वाढलं, मत्स्योत्पादन, मध उत्पादन दुप्पट झालं, कृषीमालाची निर्यात दुप्पट झाली असं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.*

*रब्बी पिकांच्या हमीभावात सरकारने वाढ केली, प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजने अंतर्गत ३ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरित झाला, असं* ***केंद्रीय कृषीमंत्री*** *शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या स्वदेशीच्या आवाहनाला शेतकरीही प्रतिसाद देत असून स्वदेशीची भावना त्यांच्यामधे रुजत आहे, असं चौहान म्हणाले.*

***होल्ड बाईट चौहान***

***त्याआधी*** *प्रधानमंत्र्यांनी देशभरातल्या निवडक शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यात सहभागी झालेले नांदेड जिल्ह्यातले शेतकरी भगवान इंगोले म्हणाले…*

***होल्ड बाईट शेतकरी***

*राज्यात पुणे इथं आयोजित मुख्य कार्यक्रमात आज धनधान्य कृषी योजनेचा प्रारंभ कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत झाला. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभं केलं जाईल, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे  म्हणाले. कडधान्य हे आपल्या आहारातल्या प्रथिनाचं मुख्य साधन असून आपल्या देशात अजूनही कडधान्याची कमतरता आहे. त्यामुळे हरभरा, मूग, तूर, उडीद, मसूर या डाळींचं उत्पादन वाढवण्याचं उद्दिष्ट सरकारने ठेवलं आहे, असं कृषीमंत्री म्हणाले. शेतीसाठी सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करा, सेंद्रीय खताचा वापर करा, शासनाच्या योजनांचा लाभ घ्या, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा, असं आवाहन भरणे यांनी केलं. शेतीसाठी सर्वांनी मिळून एकत्र काम केलं तर  महाराष्ट्र  शेतीमध्ये अग्रेसर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राज्यात इतर ठिकाणीही हा कार्यक्रम झाला.)*

**<><><><><>**

जमीन मोजणीचा निपटारा आता ३० दिवसांत होणार आहे. महसूल विभागानं यासाठी परवानाधारक खाजगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असून, राज्य सरकारनं यासंदर्भातील अधिसूचना जारी केल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं आहे. या निर्णयामुळे राज्यात प्रलंबित असलेली सुमारे तीन कोटी १२ लाख मोजणी प्रकरणं वेगाने मार्गी लागतील असा विश्वास बावनकुळे

यांनी व्यक्त केला. पोटहिस्सा, हद्द कायम, बिनशेती, गुंठेवारी, संयुक्त भूसंपादन मोजणी, वनहक्क दावे मोजणी, नगर भूमापन मोजणी, गावठाण भूमापन मोजणी आणि सिमांकन आणि मालकी हक्कासाठी अत्यावश्यक असणारी मोजणी प्रक्रिया आता जलदगतीनं पूर्ण होईल असं ते म्हणाले. यापुढे राज्यात 'आधी मोजणी, मग खरेदी खत आणि त्यानंतर फेरफार' अशा पद्धतीने जमिनीचे व्यवहार व्हावेत यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

पूरग्रस्त शेतकऱ्यांना लाभ मिळावा यासाठी मदतीचे नियम शिथिल केल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड - बावनकुळे बाइट**

**<><><><><>**

अतिवृष्टीग्रस्त भागातील शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रति हेक्टर मदत द्यावी, कर्जमाफी करावी आदी मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज छत्रपती संभाजीनगर इथं मोर्चा काढला. या मोर्चाला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी संबोधित केलं. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३१ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केल्याचं सरकारने सांगितलं. मात्र  ही सर्वात मोठी थाप होती अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. खरडून गेलेल्या जमीनीसाठी तीन लाखांच्या मदतीची घोषणा सरकारने केली आहे, त्यामुळे त्यातले एक लाख दिवाळीपूर्वी शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावेत अशी मागणी त्यांनी केली. कर्जमाफी केली नाही तर शेतकरी राज्यभरात आंदोलन करतील, असा इशाराही त्यांनी दिला.

**<><><><><>**

राज्य शासनानं कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर केलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते आज मुंबईत बोलत होते. आजचा काळ कृत्रिम बुद्धिमत्तेचा असून या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजात साक्षरता आणि समता निर्माण होऊ शकते असं त्यांनी सांगितलं. शासनानं एचपी सोबत डिजिटल मीडिया

सेंटर ऑफ एक्सलन्स उभारलं असून सर्वसामान्यांना नव्या तंत्रज्ञानांचा, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रवेश सहज मिळावा यासाठी भागीदारीचा आराखडा तयार करण्याचं ठरवल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

सांगोला तालुक्याचे माजी आमदार गणपतराव देशमुख यांच्या घरावर काल झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आज सांगोल्यात सर्वपक्षीय बंद पुकारण्यात आला होता. हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागणीचं निवेदन आंदोलनकर्त्यांनी तहसीलदारांना दिलं.

<><><><><>

मुंबई पोलिसांनी गँगस्टर छोटा राजनचा सहकारी रवी मल्लेश व्होरा उर्फ डी. के राव याच्यासह तिघांना खंडणी प्रकरणात काल रात्री अटक केली. एका बिल्डरकडून १ कोटी रुपये खंडणी घेतल्याच्या आरोपाखाली डी. के राव याला पोलिसांनी अटक केली.

<><><><><>

अन्न आणि औषध प्रशासनाने डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय कफ सिरपची विक्री करणाऱ्या औषध विक्रेत्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधे देणाऱ्या राज्यातल्या ८८ विक्रेत्यांना औषध विक्री बंदीचे आदेश देण्यात आले आहेत तर १०७ विक्रेत्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

पुण्यात २० औषधविक्रेत्यांवर नोटीस आणि निलंबनाची कारवाई केल्याची माहिती पुणे विभागाचे सह आयुक्त गिरीश हुकरे यांनी दिली. ऑनलाइन औषध विक्री करणाऱ्या कंपन्यांवरही कारवाई करण्याची मागणी पुणे जिल्हा औषधविक्री संघटनेने केली आहे.

<><><><><>

नागपूरातल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला.

'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे...' या विद्यापीठ गीताचं सामूहिक गायन करून 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' केला. अमरावतीमधल्या श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात लाखो भाविकांकडूनही त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. हा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी काही वेळासाठी राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक थांबविण्यात आली होती. तसंच यात्रेतल्या दुकाने, भोंगे काही वेळाकरिता बंद करण्यात आल्यामुळे शांततेत, शिस्तबद्धतेनं मौन श्रद्धांजलीचा कार्यक्रम पार पडला.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान नवी दिल्लीत सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात वेस्ट इंडिजचा डाव घसरला. भारतानं उभ्या केलेल्या ५१८ धावांचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजचे खेळाडू फार काळ खेळपट्टीवर टिकू शकले नाहीत. त्यांच्या एकाही खेळाडूला अर्धशतकही करता आलं नाही. दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा वेस्ट इंडिजनं पहिल्या डावात ४ गडी बाद १४० धावा केल्या आहेत. रविंद्र जडेजानं ३ गडी टिपले.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. याकाळात, विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

//<><><><><>//